**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१०६/२०१३</u>**
**<u>वनिता व ईतर वि. प्रभावती व ईतर</u>**

-:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::-

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. बेलीफ अहवाल निशाणी १३१ प्रमाणे प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१ प्रभावती यांना दि.२२/०१/२०२५ रोजी प्रतिदावा समन्सची बजावणी झालेली आहे. त्याचप्रमाणे बेलीफ अहवाल निशाणी १३५ प्रमाणे प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.९ उषा यांना दि.०७/०८/२०२५ रोजी प्रतिदावा समन्सची बजावणी झालेली आहे. तसेच बेलीफ अहवाल निशाणी १३४ प्रमाणे प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.५ जनाबाई आणि प्रतिवादी क्र.८ सुरेखा यांना प्रतिदावा समन्सची बजावणी झालेली आहे. परंतु ते दाव्यात हजर झालेले नाहीत. सबब त्यांच्याविरुध्द प्रतिदावा एकतर्फा चालविण्यात येतो.

०२. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.२ व ११ यांनी लेखी जबाब देण्यास कसूर केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध प्रतिदावा विना लेखी जबाब चालविण्यात येतो. तसेच प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.४ म्हणजे वादी क्र.१ हे पुरसीस निशाणी १३३ प्रमाणे अधिवक्ता श्री. सोमवाड यांच्या मार्फत हजर झाले. परंतु त्यांनी लेखी जबाब देण्यास कसूर केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध प्रतिदावा विना लेखी जबाब चालविण्यात येतो.

०३. प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.३, ६, ७ व १० यांना दावा

**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१०६/२०१३</u>**
**<u>वनिता व ईतर वि. प्रभावती व ईतर</u>**

समन्सची बजावणी झालेली नाही. वादीने त्यांच्याविरुद्ध दावा समन्स बजावणीकरिता आवश्यक व परिणामस्वरूपी कार्यवाही करावी अन्यथा त्यांच्याविरुद्ध प्रतिदावा खारीज करण्यात येईल.

०४. आदेश संगणकावर टंकलिखित करून खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2025.11.21 17:12:07 +0530

**ठिकाण – देवणी** **( श.अ. सुरजुसे )**
**दिनांक – २१–११–२०२५** **दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**देवणी.**